(काशिनाथ देवरे वि. मधुकर आहिरे )

**नियमित दिवाणी दावा क्र.२०४/२०१९.**

निशाण क्र. १९ सोबत.

# निशाणी क्रमांक १९ वरील आदेश

सदरचा अर्ज वादीने दावा दुरुस्ती करणेकामी दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जाच्या कामी वादीचे कथन असे की, सदरचा दावा हा वादीने अतिक्रमण काढुन करणेकामी दाखल केलेला आहे. वादीचे कथन असे आहे की, सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांस समन्सची बजावनी होवुन देखील तो दाव्यात हजर झालेला नाही. प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकत गट नंबर ३१०/२ ही त्याचा भाउ चिंतामण निंबा आहिरे याचे नावावर केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर इसमास प्रतिवादी क्र.१३ म्हणुन दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे आहे, त्यामुळे वादींनी सदरहु अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादींनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही त्यामुळे सदर अर्ज त्यांच्या म्हणण्याविना चालविण्यात आला.

०३. निशाणी क्र.१८/१ वर वादींनी दाखल केलेल्या दावा मिळकतीचा ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता चिंतामण निंबा अहिरे यांचे नाव दिसुन येते. वादी सुचवत असलेली दुरुस्ती ही प्रतिवादी दाव्यात हजर होण्यापुर्वीची असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सकृतदर्शनी, दावा गुणदोषावर निर्णित करणेसाठी, अनेकविध प्रकरणांची संख्या टाळण्यासाठी व दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी वादी यांचा प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. प्रस्तुत दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्यास मदत होणार आहे. वरील सर्व कथनांचा व वस्तुस्थितीचा विचार करता मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. वादीचा प्रस्तुत अर्ज (निशाणी १९) मंजूर करण्यात येतो.

२. वादीने अर्जात नमुद केलेप्रमाणे त्यांच्या दाव्यामध्ये आदेशाचे तारखेपासून १४ दिवसांचे आत दुरुस्ती करणेची आहे.

३. वादीने त्याची दावा दुरुस्त प्रत पटलावर सादर करावी.

सही/-

**( अ. सु. कोष्टी )**

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सटाणा.

स्थळ : सटाणा.

दिनांक : २१/०९/२०२१.